**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २० जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **आंतरराष्ट्रीय योगदिनाचा मुख्य कार्यक्रम उद्या कोलकात्यात पंतप्रधानांच्या उपस्थितीत होणार.**
2. **नीट यूजी २०२६ फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर देशभरातसुरक्षेचं मॉक ड्रील / गैरप्रकार रोखण्यासाठी प्रशासनातर्फे विविध उपाययोजना.**
3. **राज्यातील ९० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मोठा दिलासा मिळणारः कृषी मंत्री दत्तात्रय भरणे.**
4. **ओबीसी समाजाच्या स्वतंत्र जनगणनेसाठी राज्यव्यापी आंदोलन उभारण्याची तयारी सुरू असल्याची काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांची माहिती.**
5. **अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समिती द्वारे उपवर्गीकरणाच्या विरोधात नागपुरात मोर्चा आयोजित.**

-----------------------------------------------------

आंतरराष्ट्रीय योग दिवस

१२ वा ‘आंतरराष्ट्रीय योग दिवस’ उद्या साजरा होणार आहे. ‘निरोगी वयोवृद्धीसाठी योग’ अशी यंदाच्या योगदिनाची संकल्पना असून जगभरात सुमारे अडीच हजार ठिकाणी विविध संस्था संघटनांतर्फे योगविषयक कार्यक्रम होणार आहेत. २१० पेक्षा जास्त इंडियन मिशन्सच्या पुढाकारातून हे कार्यक्रम होणार आहेत. उद्या योगदिनाचा मुख्य कार्यक्रम कोलकात्याच्या ऐतिहासिक रेड रोडवर होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण सकाळी साडे सहा वाजल्यापासून आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून केलं जाणार आहे. दरम्यान, ओडिशा सरकारच्या दोन वर्षांच्या कार्यकाळाच्या पूर्ततेनिमित्त, मयूरभंज जिल्ह्यातील रायरंगपूर इथं आयोजित कार्यक्रमात पंतप्रधानांनी भारतातील तसंच जगभरातील लोकांना 'योग दिना'त मोठ्या संख्येनं सहभागी होण्याचं आणि योगाचा जीवनशैली म्हणून स्वीकार करण्याचं आवाहन केलं.

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या मध्य प्रदेशात जबलपूर इथं आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

---------------------------------------------------------

नीट यूजी

नीट यूजी २०२६ फेरपरीक्षा उद्या होणार असून याची पूर्वतयारी म्हणून आज एनटीएनं देशभरात मॉक ड्रील आयोजित केलं. परीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत व्हावी यासाठीच्या तयारीचा हा भाग आहे. या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत एनटीएच्या मुख्य कार्यालयाबाहेरची सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. उद्या होणाऱ्या नीट यूजी फेरपरीक्षेची सर्व तयारी पूर्ण झाल्याचं राष्ट्रीय चाचणी संस्था (एनटीए)नं स्पष्ट केलं आहे. देशातील ५५१ आणि परदेशातील १४ शहरांमध्ये ही परीक्षा होणार असून २२ लाख ७९ हजारांहून अधिक विद्यार्थी यात सहभागी होणार आहेत. परीक्षा सुरक्षित आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी दोन लाख कर्मचारी तैनात करण्यात आले असून सर्व केंद्रांवर सीसीटीव्ही आणि आधार आधारित बायोमेट्रिक व्यवस्था करण्यात आली आहे. प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीसाठी जीपीएसयुक्त पोलिस वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षा केंद्र असलेल्या जिल्ह्यांमध्ये विशेष सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या असून जिल्हास्तरावर देखरेख समित्याही स्थापन करण्यात आल्या आहेत. ही परीक्षा उद्या दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजून १५ मिनिटांपर्यंत होणार असून विद्यार्थ्यांनी सकाळी ११ ते ११.३० वाजेपर्यंत केंद्रावर उपस्थित रहावं, असं आवाहन एनटीएनं केलं आहे. पेपरफुटीसारखे गैरप्रकार रोखण्यासाठी टेलिग्रामवरील तात्पुरत्या बंदीचा केंद्र सरकारचा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयानं कायम ठेवला आहे. दरम्यान, उद्या होणाऱ्या नीट-यूजी फेरपरीक्षेसाठी नागपूर इथल्या एका विद्यार्थ्याला अबुधाबी इथं परीक्षा केंद्र देण्यात आल्याची बातमी प्रसारमाध्यमांमध्ये प्रकाशित झाली होती. याची एनटीएनं तातडीनं दखल घेत हा प्रश्न सोडवला, या विद्यार्थ्याला नागपूर इथंच परीक्षा केंद्र दिल्याचं एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह यांनी सांगितलं. नीट-यूजी 2026 परीक्षेच्या पार्श्वभूमीवर दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागानं परीक्षार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी विशेष व्यवस्था केली आहे. नागपूर, गोंदिया, भंडारा, राजनांदगाव, बालाघाट आणि छिंदवाडा येथील प्रमुख स्थानकांवर विशेष निगराणी ठेवण्यात येणार असून नियंत्रण कक्षही कार्यान्वित करण्यात आला आहे. अतिरिक्त प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन विशेष रेल्वे सेवा आणि काही गाड्यांना अतिरिक्त डबे जोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

-----------------------------------------------------------

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा 23 वा हप्ता आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. महाराष्ट्रातील 90 पूर्णांक 85 लाख शेतकरी कुटुंबांच्या खात्यात सुमारे 1 हजार 817 कोटींची रक्कम जमा करण्यात आल्याची माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. या योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी 6 हजारांची आर्थिक मदत तीन हप्त्यांमध्ये दिली जाते. आतापर्यंत राज्यातील शेतकऱ्यांना 22 हप्त्यांद्वारे सुमारे 41 हजार 83 कोटींचा लाभ मिळाला असून खरीप हंगामाच्या तोंडावर 23 व्या हप्त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे भरणे यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या निर्णयानुसार 20 जून हा दिवस राज्यभर 'पीएम किसान उत्सव दिवस' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.

-----------------------------------------------------------

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा

कोल्हापूरच्या श्री अंबाबाई मंदिर विकास आराखड्यांतर्गत १४ शे ४५ कोटी ९७ लाख रुपयांच्या विविध कामांच्या कोनशीलेचं अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज करण्यात आलं. मूळ मंदिराचं जतन, संवर्धन आणि दुरुस्तीच्या कामांचा या विकास आराखड्यात समावेश आहे. अंबाबाई मंदिर कॉरिडॉरच्या माध्यमातून 'विकासही आणि वारसाही' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली जात असल्याचं अमित शाह यावेळी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत अयोध्येतील राम मंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडॉर, केदारनाथ, बद्रीनाथ आणि सोमनाथ मंदिरांच्या विकासाची कामं झाल्याचा उल्लेख शहा यांनी केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि अन्य मंत्री तसेच अधिकारी उपस्थित होते.

-----------------------------------------------------------

एसटी आषाढी

राज्य परिवहन महामंडळानं आषाढी एकादशी यात्रेसाठी यंदा साडे पाच हजार विशेष एसटी बसेसचं नियोजन केलं असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्यातील कोणत्याही गावातून 40 किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी मागणी केल्यास थेट पंढरपूरसाठी विशेष बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या बस सेवेत शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार असून, 75 वर्षांवरील ज्येष्ठ

नागरिकांना मोफत प्रवास, तर महिलांना तिकीट दरात 50 टक्के सवलत मिळणार आहे. मागील वर्षी एसटीनं 5 हजार 200 विशेष बसेसच्या माध्यमातून 21 लाख 95 हजार भाविकांची वाहतूक केली होती. यात्रेदरम्यान सेवेत असलेल्या सुमारे 13 हजार कर्मचाऱ्यांसाठी चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांच्या सुविधेसाठी पंढरपूर इथं चार तात्पुरती बस स्थानकं उभारण्यात येणार असून, पिण्याचं पाणी, शौचालय, आरक्षण केंद्र आणि चौकशी कक्षासह विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

-----------------------------------------------------

विजय वडेट्टीवार

ओबीसी समाजाच्या स्वतंत्र जनगणनेसाठी राज्यव्यापी आंदोलन उभारण्याची तयारी सुरू असल्याची माहिती काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. स्वतंत्र ओबीसी कॉलम नसल्यास समाजाच्या घटनात्मक हक्कांवर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. राज्यावर दुष्काळाचं सावट असून एल-निनोच्या प्रभावामुळे पाणीटंचाई तीव्र होण्याची शक्यता असल्यानं सरकारनं तातडीनं सर्वपक्षीय बैठक बोलावून कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणीही त्यांनी केली. राज्यातील वाढती गुन्हेगारी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावर पावसाळी अधिवेशनात सरकारला जाब विचारला जाईल, असंही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं.

-----------------------------------------------------

उपवर्गीकरण विरोधी मोर्चा

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाच्या विरोधात आज नागपुरात अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीनं भव्य मोर्चाचं आयोजन करण्यात आलं. हा मोर्चा दीक्षाभूमी ते जिल्हाधिकारी कार्यालय असा काढण्यात आला. या मोर्चामध्ये राज्यभरातील विविध सामाजिक संघटना, विद्यार्थी, युवक तसेच कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. मोर्चाच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारनं अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये, तसेच उपवर्गीकरणाचा निर्णय तात्काळ मागं घ्यावा, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली. यावेळी आरक्षणाच्या मूळ स्वरूपाचे संरक्षण करण्याची गरज असल्याचे मत विविध वक्त्यांनी व्यक्त केले. मोर्चामध्ये सहभागी झालेल्या नागरिकांनी हातात भारतीय तिरंगा ध्वज घेऊन तिरंग्याचा सन्मान राखत शिस्तबद्ध पद्धतीनं सहभाग

नोंदविला. मोर्चादरम्यान कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

---

रोजगार योजना

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेचा राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रम नवी दिल्ली इथं पंतप्रधानांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 2 हजार 400 कोटी रुपयांचं प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्यात आलं. देशव्यापी जनजागृतीचा एक भाग म्हणून देशातील 200 ठिकाणी एकाच वेळी या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. चंद्रपुरातही चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्थेच्या सभागृहात विशेष कार्यक्रम घेण्यात आला. आतापर्यंत चंद्रपूर जिल्ह्यातील 1 हजार 609 आस्थापनांनी या योजनेसाठी नोंदणी केली असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी नियोक्त्यांकडून नवनियुक्त सदस्यांना 32 नियुक्तीपत्रे वितरित करण्यात आली.

---

बी. टी. देशमुख निधन

विदर्भातल्या शिक्षक चळवळीतले प्रभावी संघटक, माजी आमदार आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राध्यापक बी. टी. देशमुख यांचं काल निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. देशमुख यांनी आयुष्यभर शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी आणि शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्यानं संघर्ष केला. प्राध्यापक आणि शिक्षक नेते म्हणून उच्च शिक्षण क्षेत्रातल्या अनेक महत्त्वाच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रभावी नेतृत्व केलं. संशोधन, उच्च शिक्षण, विद्यापीठीय सुधारणा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्थेसाठी त्यांनी सातत्यानं कार्य केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांनी देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

---

ड्राय स्पेल'

एल निनोच्या प्रभावामुळे भंडारा जिल्ह्यात 'ड्राय स्पेल'ची स्थिती निर्माण झाली असून खरीप हंगामातील पेरण्या खोळंबल्या आहेत. १ ते २० जूनदरम्यान अपेक्षित ११८ पूर्णांक ५ मिलीमीटर पावसापैकी केवळ २२ पूर्णांक ८ मिलीमीटर, म्हणजेच १९ पूर्णांक २ टक्के पावसाची नोंद झाली आहे. पावसाअभावी शेतकरी दुबार पेरणीच्या भीतीनं सावध भूमिका घेत असून ग्रामीण भागात पाणीटंचाईचं संकटही गडद

होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार २४ जूननंतर पूर्व विदर्भात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हवामानाचा अंदाज लक्षात घेऊनच पेरणी करण्याचं आवाहन प्रशासनानं शेतकऱ्यांना केलं आहे.

-----------------------------------------------------------